# महात्मा ज्योतीबा फुले यांचा सामाजिक दृष्टिकोण: एक अध्ययन

डॉ. विनोद मारोतराव मुडे
सहायक प्राध्यापक – राज्यशास्त्र विभागप्रमुख
श्रीसाईबाबा लोक प्रबोधन कला महाविद्यालय,वडणेर. जिल्हा वर्धा.

**सारांश (Abstract) :**

महात्मा ज्योतिबा फुले एक समाज सुधारक, समाज प्रबोधक, विचारवंत, लेखक आणि क्रांतिकारी होते. त्यांनी स्त्रियांच्या शिक्षणासाठी अतोनात परिश्रम घेतले आहे. तसेच सत्यशोधक समाजाची त्यांनी निर्मिती केली आहे. शेतकरी आणि बहुजन समाजाचे अन्यायाविरुद्ध प्रबोधन केले आहे. स्त्री-पुरुष समानतेसाठी त्यांनी त्यांच्या पत्नीला त्यांच्या सर्व सामाजिक कार्यात सहभाग करून घेतले होते. महात्मा फुलेंचे या वागण्याचा तत्कालीन उच्चवर्णीयांना राग येत होता. त्यामुळे सामाजिक नियमांचे उल्लंघन केल्याचा आरोप महात्मा फुले यांच्यावर केला.जाती व्यवस्थेचा विरोध त्यांनी केला आहे. महात्मा फुले हे मुख्यतः मानवी समतेचे पुरस्कर्ते होते. मानवता व समता म्हणजे महात्मा फुले.

महात्मा फुले यांनी धर्म, जात मानली नाही. ते सर्वांना समान दृष्टीने पाहत होते. त्यांच्या मतानुसार कोणताही धर्म ईश्वराने निर्माण केलेला नाही आणि जातिभेद ही केवळ मानवाची निर्मिती आहे. यासाठी ज्योतीबांनी रूढीवादी तत्कालीन समाजावर प्रखर टीका केली. काहींनी तर त्यांच्यावर ख्रिश्चन धर्माचा प्रचार करत असल्याचाही आरोप केला होता. त्यांच्या स्वतःच्या कुटुंबीयांनीही त्यांना या कार्यासाठी विरोध केला होता. मात्र ज्योतिबा फुले आपल्या विचारांवर ठाम होते. त्यांनी ही चळवळ पुढे चालू ठेवली.त्यांच्या महान कार्याचा गौरव करण्यासाठी त्यांना समाजाकडून 'महात्मा' ही पदवीसुद्धा देण्यात आलेली होती.भारतीय समाज व्यवस्थेवर पसरलेले दैववादाचे, नैराश्याचे, औदासिन्याचे मळभ दुर करुन त्याला आत्मावलोकनाचा, आत्मोद्धाराचा मार्ग दाखवून स्वसामर्थ्याची यथार्थ जाणीव करून देणारा समाजसुधारक म्हणून महात्मा ज्योतीबा फुले यांचे स्थान अनन्यसाधारण आहे.

**बीज संज्ञा(Key-Words) :**

सामाजिक कार्य,स्त्री उध्दाराचे कार्य, कृषीविषयक विचार

**शोधनिबंधाची उद्दिष्टे (Objectives of Research Paper) :**

1. महात्मा फुले यांच्या सामाजिक व स्त्री उध्दाराच्या कार्याचा आढावा घेणे.
2. महात्मा फुले यांचे कृषीविषयक संदर्भातील विचारांचा अभ्यास करणे.
3. आजच्या परिस्थितीत महात्मा ज्योतिबा फुलेयांच्या विचारांची भूमिका.

**गृहीतके (Hypothesis) :**

भारतीय समाजाच्या विकासात महात्मा फुले यांच्या विचारांचे योगदान हे महत्वपूर्ण आहे.

**प्रस्तावना (Introduction) :**

महात्मा फुले यांनी शिक्षणाचे महत्त्व ओळखून बहुजन समाजाचे अज्ञान दारिद्र्य आणि समाजातील जातिभेद पाहून त्यांनी ही सामाजिक परिस्थिती सुधारण्यासाठी सर्व समाजातील स्त्रियांसाठी शिक्षणाची दारे खुली केली. नीती हाच मानवी जीवनाचा आधार आहे. हा विचार मांडणारे ज्योतिराव फुले एक तत्त्वचिंतक व्यक्तिमत्त्व होते. महात्मा फुलेंनी सामाजिक प्रबोधन करण्यासाठी शेतकऱ्यांचा आसूड हा ग्रंथ लिहिला असून सामाजिक प्रबोधन यामधून व्हावे, हा

त्यांचा उद्देश होता.मानवी हक्कावर इ.स.१७९१ मध्ये थॉमस पेन यांनी लिहिलेले पुस्तक महात्मा फुले यांच्या वाचनात आले. त्याचा प्रभाव त्यांच्या मनावर झाला. सामाजिक न्यायाबाबत त्यांच्या मनात विचार येऊ लागले. त्यामुळेच विषमता दूर करण्यासाठी स्त्रीशिक्षण आणि मागासलेल्या जातीतील मुलामुलींच्या शिक्षण यावर त्यांनी भर देण्याचे ठरवले. सामाजिक भेदभाव त्यामुळे कमी होईल असे त्यांचे निश्चित मत आणि अनुमान होते.

19 व्या शतकाच्या उत्तरार्धात भारतीय समाजातील अंधश्रद्धा, रुढी, परंपरा, जातीयता नष्ट करुन समताधिष्ठित समाज निर्माण करण्याच्या प्रयत्नातून प्रार्थना समाज, थिऑसॉफिकल सोसायटी, आर्य समाज यासारख्या संस्था कार्यरत होत्या. या सर्वांपेक्षा महात्मा फुले यांनी केलेले सामाजिक कार्य अत्यंत कृतीशील होते. त्यामूळेच त्यांचे कार्य राजर्शी शाहु महाराज, डॉ. आंबेडकर ते सर्वसामान्य जनतेला प्रेरणादायी ठरले आणि आजही महात्मा फुले यांच्या सामाजिक विचारांचा प्रभाव भारतीय नवविचारवादी आणि आधुनिक समाज सुधारकांवर दिसून येतो. इतकेच नव्हे तर महात्मा फुले आजही आपल्याला दिशा दाखवित आहेत. म्हणूनच महात्मा फुले यांचे विचार आजही प्रस्तुत आहे. त्यामुळेच प्रस्तुत शोधनिबंधामध्ये महात्मा फुले यांच्या सामाजिक दृष्टिकोनावर प्रकाश टाकण्यात येत आहे.

**महात्मा फुले यांचे सामाजिक कार्य :**

आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये समाजाच्या उत्थानासाठी जीवन समर्पित करणारा महान पुरूष म्हणजे महात्मा जोतीबा फुले होय. महाराष्ट्रातील बहुजन समाज, अस्पृश्य बांधव व असहाय्य स्त्रीया यांच्या दुःखाला वाचा फोडून मातेच्या ममतेप्रमाणे नष्ट करणारा देवदुत म्हणजे महात्मा फुले होय. महात्मा जोतीबा फुले यांनी आपले व्यक्तिमत्व स्वयंप्रेरणेने आणि आपल्या स्वतःच्या प्रयत्नांनी घडविले होते. त्यांचा पिंड हा कृतीशिल क्रांतिकारकांचा होता. आधुनिक भारतातले पहिले समाज क्रांतिकारक म्हणजे महात्मा फुले होय. कारण ते सामान्यातील असले तरी विचाराने व कर्तृत्वाने असामान्य होते. सामाजिक विषमतेविरूध्द जोतीबांनी बंड पुकारले. समतेसाठी त्यांनी शुद्रातीशुद्रांना संघटित करण्याचे प्रयत्न केले. 'शिक्षण व समता' या दोन शब्दात त्यांच्या कार्याचे यथोचित वर्णन करता येईल ते नुसताबोलघेवडे सुधारक नव्हते तर कर्ते सुधारक होते. बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी अविरत झगडणारे ते ऋषी होते. महाराष्ट्राच्या सामाजिक प्रबोधनाला त्यांनी वेगळीच दिशा दाखवली. स्त्रीयांच्या व अस्पृश्यांच्या उध्दारासाठी ते चंदनासारखे झिजले. महाराष्ट्रातील सर्वसामान्यासाठी रात्रंदिवस झगडणारे ते सेवक होते. सामाजिक, आर्थिक, धार्मिक विषमतेविरूध्द बंड करून सामाजिक समता व सहिष्णुता प्रस्तापित करण्यासाठी जोतीबांनी महत्वपूर्ण कार्य केले.

ज्योतीबा फुले यांनी सामाजिक विषमता नष्ट करण्यासाठी फार मोठे प्रयत्न केले. त्यावेळच्या समाजात विषमता, जातिभेद, अज्ञान, स्त्रीदास्य यासारख्या अनिष्ट प्रथा केवळ धर्मामुळे दृढमुल झाल्या आहेत असे त्यांचे स्पष्ट मत होते. त्यांनी सर्व बाबींचा विचार करून प्रथम स्त्रियांच्या उध्दारांचे कार्य हाती घेतले. हिंदु स्त्रियांना गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी प्रयत्न करावयाचे ठरविले. भारतीय समाजाने स्त्रियांना समतेपासुन व शिक्षणापासून वंचित ठेवले होते. व्यक्तिचे जीवन विकसित करण्यासाठी शिक्षण हे एक प्रमुख साधन आहे असे जोतीबांचे मत होते. शिक्षणामुळे मनुष्यात स्वाभिमान निर्माण होतो. सत्य-असत्याचा उलगडा होतो. म्हणुन शिक्षण हे सर्व सुधारणांचे मुळ आहे असे त्यांचे मत होते. 'जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगाते उध्दारी' या तत्वाचे ते पाईक होते. मुलांच्या कर्तव्याचे मार्गदर्शन मातेकडून

होत असते. कर्तव्याची जाणीव झाली तरच देशाची प्रगती होते या विचाराचे ते होते. सनातनांच्या मते स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नाही. त्यांना शिक्षण देणे म्हणजे देव, धर्म, समाज यांच्याविरुध्द वर्तन करणे होय. स्त्रिने शिक्षण घेणे म्हणजे भ्रष्टाचार करणे असे मानले जात होते. स्त्रीला शिक्षण दिले तर स्त्री कुमार्गाला लागेल आणि घरच्या सुखात अडसर येईल, मुलींनी शिक्षण घेतले तर तिला अकाली वैधव्य येईल अशी खुळी समजुत समाजात रूढ होती. स्त्रियांना घराबाहेर पडणे शिष्टसंमत मानले जात नव्हते. चूल आणि मूल एवढेच त्यांचे कार्यक्षेत्र निश्चित केलेले होते. बालविवाह, जरठ-कुमार विवाह यांच्या प्रथा असल्यामुळे विधवांची स्थिती अत्यंत दयनिय होती. समाजाकडून त्यांना तुच्छतेची वागणुक दिली जात होती. केशवपण करून विद्रुप केले जाई. धार्मिक विधिपासून व उत्सवापासून त्यांना वंचित केले होते. स्त्री परतंत्र व अबला म्हणून ओळखली जात होती. एखाद्या विधवेकडून कुकर्म घडलेच तर तिला फार मोठे कठोर शासन समाज करीत असे. एकंदरीत त्या काळात समाजाच्या स्त्रीबाबतच्या अपेक्षा, अन्यायी व पक्षपातीपणाच्याच होत्या. क्रुर व लज्जास्पद चालीरीतीमुळे स्त्रियांची दैन्यावस्था होती. समाजाने अनेक बंधनांनी स्त्रियांना जखळून ठेवले होते. त्यांचे हक्क डावलले होते. समानता व मानवतेच्या भूमिकेतून त्यांच्याकडे पाहिले जात नव्हते. उपभोग्य वस्तू अशीच त्यांच्याकडे पाहण्याची वृत्ती होती. अशावेळी महात्मा जोतीबा फुले यांनी स्त्रियांच्या उध्दराचे कार्य हाती घेतले. त्यासाठी त्यांनी फार मोठे कष्ट सहन केले. स्त्री ही समाजाचे मूळ आहे असे मानून जोतीबांनी स्त्रीशिक्षण, विधवाविवाह, बालहत्या प्रतिबंध, केशवपण यासारख्या महत्वाच्या सामाजिक समस्येबाबत भरीव कार्य केले.

'बहूजन हिताय बहूजन सुखाय' हा फुलेंच्या विचारांचा केंद्रबिंदु होता. ज्या बहुजन समाजाला वर्षानुवर्षे समाजाने झिडकारले त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात सम्मीलित करून त्यांना मान्यता देणे, हे जणु ज्योतीबांचे जीवित कार्यच बनले. शुद्रातिशुद्र, कष्टकरी, कामकरी, शेतकरी, स्त्रिया या वर्गावर होत असणा-या अन्यायाची फुलेंनी कारणमीमांसा केली. आणि या वर्गाला त्यांचे न्याय हक्क मिळावेत, आपल्यावर होत असणा-या अन्याय-अत्याचाराची चीड त्यांच्या मनात निर्माण व्हावी आणि प्रस्थापितांकडून होत असणा-या अन्यायाविरूध्द लढा देण्याची हिम्मत निर्माण व्हावी. आपल्यावर होत असलेल्या अन्याया विरूध्द लढा देण्यासाठी अशा पीडित वर्गाला तयार करण्याचे कार्य फुलेंनी केले. या वर्गाचे उत्थान झाल्याशिवाय भारतीय समताधिष्ठित समाजाची निर्मीती होणार नाही अशी स्पष्ट भूमिका त्यांनी मांडली. अशी भूमिका घेणारे ते पहिले भारतीय म्हणता येईल.

समता, न्याय व बंधुभाव ही मुल्ये भारतीय जनमानसात रुजावी हे म. फुले यांचे अंतिम स्वप्न होते. शिक्षणाद्वारे जागृती आणि नंतर भक्कम पायावर आधारित सामाजिक सुधारणेची इमारत हे त्यांच्या कार्याचे स्वरूप होते. ज्योतिबांनी व त्यांच्या सहका-यांनी पुणे येथुन सुरू केलेली सामाजिक सुधारणेची चळवळ पाहतापाहता मुंबई, सातारा, बडौदा व पुढे विदर्भातही पसरली. आज या चळवळीचा फार मोठा विस्तार झालेला दिसतो. या चळवळीच्या सकस, सुलभ व वैशिष्टयपुर्ण विचारांमुळे सत्यशोधनाची मुल्य रूजलीत व कालांतराने विकसित झाली. आमुलाग्र सामाजिक परिवर्तनाची बिजे ज्योतिबांच्या कार्यात होती. त्यांचे सर्व श्रेय ज्योतिबांना द्यावे लागेल.

**महात्मा फुले यांचे स्त्री उध्दाराचे कार्य :**

**1)स्त्रीशिक्षण :-** सनातन्यांच्या आक्षेपांना प्रत्युत्तर देण्यासाठी जोतीबांनी प्रथम स्त्रिशिक्षणाचे कार्य हाती घेतले. स्त्रीशिक्षण म्हणजे पर्यायाने तिच्या मुलाचे शिक्षण. आपण जर एखादया पुरुशाला शिक्षण दिले तर ते एकट्याला दिल्यासारखे आहे. परंतु जर एका स्त्रिला शिक्षण दिले तर ते सर्व कुटुंबाला दिल्यासारखे आहे हे ओळखून जोतीबांनी स्त्रिशिक्षणाला प्रारंभ केला. जोतीबा फुलेंनी अत्यंत प्रतिकुल परिस्थितीत इ.स. १८४८ मध्ये मुलींच्या शिक्षणासाठी पुण्यामध्ये एक शाळा सुरू केली. अस्पृश्य समाजातील स्त्रियांना तेथे शिक्षण दिले जात होते. त्या शाळेत जोतीबा स्वतः शिक्षक होते. स्वतंत्रपणे मुलींसाठी शाळा काढणारे ते पहिले भारतीय होते. या शाळेत अस्पृश्यांच्या मुलींना शिकविण्यासाठी शिक्षिका मिळेना. म्हणून जोतीबांनी पत्नी सावित्रिबाईंना शिकवून शिक्षिका म्हणून नेमले. सनातन्यांना ही गोष्ट समाजद्रोही आणि धर्मद्रोही वाटली. त्यांच्याविरूध्द प्रचंड संतापाची लाट उसळली. त्यांनी सावित्रिबाईंना त्रास देण्यास सुरूवात केली. चिखल फेकणे, घाण टाकणे, दगड मारणे, शिव्या देणे इ. मात्र या माऊलीने हा त्रास सहन करून आपले कार्य चालुच ठेवले. सनातन्यांनी गोविंदरावाचे कान भरल्यामुळे जोतीबांना घर सोडावे लागले. तरिही जोतीबांनी आपले कार्य नेटाने चालु ठेवले. समाजातील कनिष्ठ वर्गाला ज्ञानाचे दरवाजे उघडण्याचे क्रांतिकारक कार्य जोतीबांनी केले. पहिली शाळा बंद पडल्यावर इ.स. १८५१ मध्ये बुधवार पेठेत दुसरी मुलींची शाळा तसेच १८५१ मध्येच रास्ता पेठेत तिसरी, १८५२ मध्ये वेताळ पेठेत चौथी मुलींची शाळा सुरू केली. या कार्याला सुव्यवस्थित स्वरूप प्राप्त व्हावे म्हणून जोतीबांनी एक कार्यकारी समिती स्थापन केली.

**2)विधवा पुनर्विवाह: -** जोतीबा फुले ब्राम्हणव्देष्टे होते असे म्हटले जाते. परंतु समाजाजील कोणत्याही घटकांवरील अन्यायाने त्यांचे मन व्याकुळ होत असे. त्याकाळी ब्राम्हण समाजात विधवा स्त्रियांचे फार हाल असत ते पाहून त्यांचे मन अस्वस्थ झाले. स्त्रीयांचे हाल थांबावेत, त्यांच्या जीवनात चांगले वळण लागावे म्हणून जोतीबांनी विधवा पुनर्विवाहाचा धडाडीने पुरस्कार केला. त्यांनी इ.स. १८६४ मध्ये पुण्यातील गोखल्यांच्या बागेत एक विधवा पुनर्विवाह घडवून आणला.

**3) बालहत्या प्रतिबंधक गृह:-** विधवा पुनर्विवाहाची सुधारणा त्याकाळी समाजाला पचणी पडणे कठीण होते. त्याला बराच अवधी लागणार होता. एखादया विधवेचे चूकून वाकडे पाऊल पडले तर तिची वाईट अवस्था होईल. अशा विधवा पतितांना त्याकाळी भ्रूणहत्या, आत्महत्या याशिवाय गत्यंतर नव्हते. अशा आपत्तीतून विधवांची सुटका व्हावी म्हणून जोतीबांनी विधवांना गुप्तपणे येऊन बाळंत होण्यासाठी व आपले मुल तेथे ठेवण्यासाठी बालहत्या प्रतिबंधक गृह आपल्या घराशेजारी इ.स. १८६३ मध्ये उघडले. त्या संदर्भात सर्वत्र भित्तीपत्रके वाटण्यात आली त्यात असे म्हटले होते की, विधवांनो, इथे येऊन गुप्तपणे आणि सुरक्षित बाळंत व्हा तुम्ही आपले मुल न्यावे किंवा इथे ठेवावे हे तुमच्या खुशीवर अवलंबून आहे. त्या मूलाची काळजी हा अनाथाश्रम घेईल जोतीबांनी सुरू केलेले बालहत्या प्रतिबंधक गृह हे भारतातील पहिलेच होते.

महात्मा फुले यांचे **शेतीविषयक विचार :**

महाराष्ट्र हा सुरुवातीपासुनच पुरोगामी विचारसरणी स्विकारणारे राज्य आहे. याच महाराष्ट्रात महात्मा ज्योतीबा फुलेंचा जन्म झाला. परंतु फुलेचा जन्म व तत्कालीन भारतीय शेतकऱ्यांची शेती विषयक स्थिती मात्र गंभीर होती. कारण फुलेंनी भारतीय शेतीला ग्राम विकासाचा व भारतीय अर्थकारणाचा कणा मानला. तो जर सुव्यवस्थित पायावर उभा नसेल तर मात्र शेती

व शेतकरी प्रगतीपथावर राहणार नाही. त्यामुळे त्यांना काही सोई सुविधा देण्यासाठी महात्मा ज्योतीबा फुलेंनी तत्कालीन ब्रिटीश सरकार समोर शेतकऱ्यांची बाजू उचलून धरली. याचे मुख्य कारण शेतकरी हा जगाचा पोशिंदा असतो. त्याच्या श्रमावर इतरांच्या पोटाची खडगी भरली जाते. म्हणुन त्यांनी भारतीय शेतकरी सुधारला पाहीजे त्याच्या ही श्रमाचे सोने झाले पाहीजे. ही भूमिका महात्मा फुले यांची होती. म्हणुन त्यांनी शेतकऱ्यांच्या व्यथा, वेदना जवळून अभ्यासल्या. त्यांच्या मते, प्रत्येक ग्रामात छोटे छोटे शेती कसणारे शेतकरी असतात. त्यांना सदैव ऊन, वारा, ओला दुष्काळ, कोरडा दुष्काळ, तोडधाड यापासुन आपल्या शेतीचे रक्षण करण्यासाठी दिवस व रात्र एक करावी लागते. याही परिस्थितीमध्ये उत्पादनाची निर्मिती करुन देशाच्या जनतेचे जीवन सुखी व समृद्ध करने हे शेतकऱ्यावर अवलंबून आहे. त्यासाठी शेतकऱ्यांना महात्मा फुलेंनी प्रोत्साहीत केले. शेतकऱ्यांच्या समस्या जास्त असल्यामुळे त्यावर बोट ठेवून शेतकऱ्यांच्या प्रश्नाला वाचा फोडली. ते म्हणतात की, देशाचा शेतकरी सुखी तर देश सुखी. शेतकऱ्यांची गरीबी दुर झाल्याशिवाय देश सुखी होवू शकत नाही. दुष्काळ पडताच त्यांनी शेतकऱ्यांना हाताशी धरुन शेतकऱ्यांचे आंदोलन सुरु केले. व तत्कालीन ब्रिटीश राणी व्हिक्टोरीया समोर आपल्या ओजस्वी इंग्रजी वाणीने राणीचे लक्ष भारतीय शेतकऱ्यांच्या समस्याकडे वळवीले. याशिवाय त्यांनी शेतकऱ्यांना चांगले दर्जेदार उत्पादन देणारे बि-बियाणे तसेच शेतीला लागणाऱ्या आधुनिक अवजारांची मागणी प्रत्येक भाषणात व लेखात करुन शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. महात्मा फुलेंनी शेतकऱ्यांचा आसुड या पुस्तकात भारतीय शेती व शेतकऱ्यांसाठी विविध उपाययोजना सुचवून शेतकऱ्यांसाठी महत्वाचे दालन त्यांना प्रदान केले.

**1) सिंचनाची व्यवस्था:**-भारतीय शेती व शेतकऱ्यांचे जीवन सुखी व संपन्न करायचे असेल तर आपल्या शेतीमध्ये सिंचनाची व्यवस्था करुन शेतीचे उत्पादन वाढविता येते. त्यासाठी स्वतः पुढाकार घ्यावा शेतीतून निघून जाणारे पावसाचे पाणी अडवून त्याचे जलसंधारण करावे यासाठी शासनाने त्यांना मदत करुन विविध योजनेद्वारे विहीरी, तलाव, धरणांची निर्मिती करुन देशातील शेतकऱ्यांच्या प्रगतीत हातभार लावावा.

**२) गोरक्षण व दुग्धव्यवसाय :-**भारतीय शेतकऱ्यांनी शेतीला पुरक असा गोरक्षण व्यवसाय करावा कारण शेतीला पुरक व्यवसायाची जोड असल्याशिवाय शेतीचा व शेतकऱ्यांचा विकास होणे अशक्य आहे. शेती न पिकल्यास त्याचे उदरभरण हे दुग्धव्यवसायाच्या माध्यमातुन आर्थिक मदत होईल.याशिवाय शेतीला खताचा पुरवठा होवून रासायनिक खतावर मात करता येईल.

**३) शेती संरक्षणासाठी शस्त्र वापरण्याची अनुमती :-**भारतीय शेतकरी स्वत:च्या श्रमाने घाम गाळून शेती पिकवीतो परंतू त्याच्या उत्पादनाचे संरक्षण मात्र योग्य रित्या होत नाही. त्याला योग्य संरक्षण देण्यासाठी व हिस्त्र प्राण्यांपासून शेती उत्पादनाचे रक्षण करण्यासाठी शेतकऱ्यांना शस्त्र बाळगण्याची परवानगी देण्यात यावी. किंवा शासनाने तशी उपाययोजना करावी.

**४) शेतमालाला योग्य हमी भाव :** शेतकऱ्यांनी उत्पादीत केलेल्या शेतीमालाला योग्य हमी भाव शासनाने मिळवून द्यावा. त्यातून शेतीचा लागवडी खर्च वजा जातात्याला त्याची योग्य किंमत निश्चित करुन हमी भाव जाहीर करावा.

**५) आपत्ती काळात शेतकऱ्यांना शासकीय मदत :-**आवर्णन, कोरडा दुष्काळ, ओला दुष्काळ, तोडधाड यापासून शेतीला हानी पोचत असते. त्यामूळे शेती व्यवसायाला शासनाने तत्काळ मदत करावी व शेतकऱ्यांची आर्थिक उणीव भरुन काढावी. तसेच नवनविन शेतीविषयक उपक्रम राबवून शेतकऱ्यांना मदत करावी.

**६) उत्पादन वाढीसाठी शेतकऱ्यांना पुरस्कार :-**शासनामार्फत शेतीतील उत्पादन वाढीसाठी ज्यांनी खरोखरच महत्वपूर्ण कार्य केले आहे अशा होतकरु शेतकऱ्यांना शेतीविषयक कृषी विभागामार्फत पुरस्कार प्रधान करुन त्यांचा सत्कार करावा.

**७) अल्प व्याजदरात कर्ज पुरवठा :-** महात्मा ज्योतीबा फुले म्हणतात की, शेतकऱ्यांना अल्प व्याजदरात बँकांनी कर्जाचा पुरवठा करावा. तसे आदेश शासनाने बँकांना द्यावे जणेकरुन शेतकऱ्यांची सावकार, जमीनदार या लोकांपासून त्याची आर्थिक पिळवणूक होणार नाही. यासाठी महात्मा फुलेंनी वरील उपाययोजना भारतीय शेतकऱ्यासंदर्भात लागू केल्या.

आजही गरीब मध्यम शेतकरी भिकेला लागलेला आहे. शेतीची दुरावस्था वाढत आहे. शिक्षणाच्या सार्वत्रिकरणांचे व्यापारीकरण व उच्चभ्रूकरण होत आहे. दलित, आदीवासी व स्त्रीयांना अजूनही समाजात दुय्यम स्थान आहे. जातीची नवी उतरंड आहेच. धाम्रिक पुररुज्जीवनवाद, विशेष लोकांची धनिकशाही निर्माण झाली आहे. सर्वच क्षेत्रात दलाल, मध्यस्थ, निर्माण झाले आहे, पैशाला अवास्तव महत्व देण्यात येत आहे, सामाजिक नैतिकतेचा पदोपदी खून होतांना दिसतो. या सर्व परिस्थितीवर मात करण्यासाठी ज्योतिबांच्या विचारांची कास धरुन प्रयत्न करावे लागेल. तेव्हाच जनकल्याण अर्थात देशहीत शक्य होईल.

महात्मा ज्योतीबा फुले व त्यांचे क्रांतीमय जीवन यांचे मुल्यमापन करणे कठीणच आहे. महात्मा फुले हे केवळ समाजसुधारकच नव्हते तर ते परिवर्तनशील समाज प्रबोधनासाठी अविरत झिजणारे कर्ते पुरूष होते. अस्पृश्य, स्त्रिया, शेतकरी, पिडीत बेठबिगार यांच्यावरील अन्याय व त्यांच्या शिक्षणासाठी जागृतीसाठी रचनात्मक कार्य करणारे क्रियाशील सुधारक होते. त्यांचे जीवन म्हणजे स्वातंत्र्य, समता, मानवता व विश्वबंधुत्व यांचे प्रतिक होते. आपल्या संपूर्ण आयुष्यात त्यांनी पारंपारिक दुष्टरूढी, शैक्षणिक असमानता, स्त्रियांची अधोगती, शेतक-यांचे दारिद्र्य याविरूध्द प्रखर लढा दिला. व या सर्व प्रश्नाविरूध्द आजही तितक्याच प्रखरतेने लढा देण्याचीआवश्यकता आहे.

**निष्कर्ष ( Conclusion) :**

1. महात्मा जोतीबांनी स्त्रियांची बंधने तोडून टाकली आणि तिला स्वातंत्र्याचा मार्ग चोखाळण्यास समर्थ बनविले.

2. शिक्षणामुळेच सामाजिक बदल होऊ शकतो.

3.शेतकरी सुखी तर जग सुखी हे तत्व त्यांनी देशाच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न केला.

4.सामाजिक समता, मानवता आणि विवेकवाद यावर प्रकाश टाकून राष्ट्रास खरा मार्ग दाखविला.

5. दलितांचा कैवारी, मानवी मूल्यांचा पुजारी, समतेचा उपासक, विदयेचा आग्रही सेवक, स्त्रियांचा रक्षणकर्ता, शेतकरी, कामकरी लोकांचा उध्दारकर्ता, अबलांचा साथी, अनाथांचा आधार असा थोर महात्मा महाराष्ट्राच्या मातीत होऊन गेला म्हणून आज ग्रामीण परीसरात सुखसुबत्तेचे आणि शांती, शिक्षणाचे फुलमळे फुललेले आपल्याला दिसतात.

**संदर्भ ग्रंथ सूची (Bibliography) :**


1. आचार्य, डॉ. धनंजय, भारताचा इतिहास(1761 – 1971), श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.
2. किर धनंजय, महात्मा जोतिराव फुले, पॉप्युलर प्रकाशन, चौथी आवृत्ती, मुंबई, 2008.
3. कोतापल्ले डॉ. जगन्नाथ (संपा), शेतकऱ्यांचा आसूड, मेहता पब्लिकेशन हाऊस, पुणे.

4. भिडे जी. ए., पाटील डी. –महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास.
5. नरके प्रा. हरी (संपा), महात्मा फुले : साहित्य आणि चळवळ, महात्मा ज्योतिबा फुले चारित्र्य साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन, मुंबई. 2018.